# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध बाजार भुखंडावर
**{स्थावर विभाग}** व्यवसायिक प्रकल्प विकसित करण्याकरीता MSIDC सोबत करण्यात येणारे सामंजस्य करार (MoU) प्रस्तावावर निर्णय घेणेचा प्रश्न विचारात घेणे.

नागपूर महानगरपालिका (NMC) द्वारे विविध बाजार जसे :

१) दही बाजार २) सहा बाजार एकत्र (लोहा, पोहा,भाजी ,अनाज हरीगंगा इमारत, हरीगंगा परिसर), ३) डिक दवाखाना, ४) कॉटन मार्केट (फुले मार्केट), ५) संत्रा मार्केट, ६) नेताजी मार्केट (फूल मार्केट) विकसित करण्याचे निर्णय घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ लिमिटेड (MSIDC) यांनी मनपाच्या वतीने अमलबजावणी एजन्सी म्हणून नागपूर शहरातील मनपाच्या मालकीच्या विविध बाजार भुखंडावर व्यवसायिक प्रकल्प विकसित करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. MSIDC हि शासनाची संस्था आहे व पायाभूत सुविधा विकासामध्ये तज्ञ संस्था असल्यामुळे या संस्थेकडून काम करुन घेतल्यास महानगरपालिकेस फायदा होईल.
सामंजस्य करारामध्ये ढोबळ मानाने खालील अटी व शर्तीचा समावेश आहे.

**अ)** ज्या जमीनी मनपाच्या मालकीची आहे, त्या जमिनींवर प्रकल्प Design Build Finance Operate and Sale (DBFOS) तत्वावर विकसित केले जातील.

**ब)** ज्या जमीनी मनपाला राज्य शासनाकडून किंवा इतर शासकीय प्राधिकरणाकडून मिळालेल्या आहेत, अश्या जमीनीवर ३० वर्षासाठी भाडेपट्टा राज्य सरकार च्या मान्यतेने देण्यात येईल. व त्यानंतर ३० वर्षांच्या दोन कालावधी करीता शासनाच्या मंजूरीने वाढविण्यात येईल.

महानगरपालिकेद्वारे प्रत्येक प्रकल्पाकरीता निर्धारित प्रकल्प क्षेत्रात MSIDC ची भूमिका Implementing Agency ची राहील. सदर सामंजस्य करार (MoU) एक प्रारंभिक सामंजस्य करार असून यामध्ये निर्धारित अटी व शर्ती प्रकल्प ते प्रकल्प आधारावर कार्यान्वित केले जाईल.

MoU सामंजस्य करारामध्ये प्रकल्प राबविण्याकरीता MSIDC तसेच महानगरपालिका करीता निश्चित करण्यात आलेले जबाबदाऱ्या नमूद आहे.

प्रत्येक प्रकल्पाकरीता MSIDC ला प्रकल्प व्यवस्थापन शुल्क, प्रकल्प खर्चाचे ४.५ % निश्चित करण्यात आलेले आहे.

याबाबतचे सविस्तर सामंजस्य करार (MoU) नस्तीच्या उजव्या बाजूस संलग्न केलेले आहे. सदर सामजस्य करार (MoU) प्रस्तावावर निर्णय घेणेचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 24/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 08/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध बाजार भुखंडावर व्यवसायिक प्रकल्प विकसित करण्याकरीता MSIDC सोबत करण्यात येणारे सामंजस्य करार (MoU) प्रस्तावावर निर्णय घेणेचा प्रश्न विचारात घेऊन,

नागपूर महानगरपालिका (NMC) द्वारे विविध बाजार जसे :

१) दही बाजार २) सहा बाजार एकत्र (लोहा, पोहा,भाजी ,अनाज हरीगंगा इमारत, हरीगंगा परिसर), ३) डिक दवाखाना, ४) कॉटन मार्केट (फुले मार्केट), ५) संत्रा मार्केट, ६) नेताजी मार्केट (फूल मार्केट) विकसित करण्याचे निर्णय घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ लिमिटेड (MSIDC) यांनी मनपाच्या वतीने अमलबजावणी एजन्सी म्हणून नागपूर शहरातील मनपाच्या मालकीच्या विविध बाजार भुखंडावर व्यवसायिक प्रकल्प विकसित करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. MSIDC हि शासनाची संस्था आहे व पायाभूत सुविधा विकासामध्ये तज्ञ संस्था असल्यामुळे या संस्थेकडून काम करुन घेतल्यास महानगरपालिकेस फायदा होईल.
सामंजस्य करारामध्ये ढोबळ मानाने खालील अटी व शर्तीचा समावेश आहे.

**अ)** ज्या जमीनी मनपाच्या मालकीची आहे, त्या जमिनींवर प्रकल्प Design Build Finance Operate and Sale (DBFOS) तत्वावर विकसित केले जातील.

**ब)** ज्या जमीनी मनपाला राज्य शासनाकडून किंवा इतर शासकीय प्राधिकरणाकडून मिळालेल्या आहेत, अश्या जमीनीवर ३० वर्षासाठी भाडेपट्टा राज्य सरकार च्या मान्यतेने देण्यात येईल. व त्यानंतर ३० वर्षांच्या दोन कालावधी करीता शासनाच्या मंजूरीने वाढविण्यात येईल.

महानगरपालिकेद्वारे प्रत्येक प्रकल्पाकरीता निर्धारित प्रकल्प क्षेत्रात MSIDC ची भूमिका Implementing Agency ची राहील. सदर सामंजस्य करार (MoU) एक प्रारंभिक सामंजस्य करार असून यामध्ये निर्धारित अटी व शर्ती प्रकल्प ते प्रकल्प आधारावर कार्यान्वित केले जाईल.

MoU सामंजस्य करारामध्ये प्रकल्प राबविण्याकरीता MSIDC तसेच महानगरपालिका करीता निश्चित करण्यात आलेले जबाबदाऱ्या नमूद आहे.

प्रत्येक प्रकल्पाकरीता MSIDC ला प्रकल्प व्यवस्थापन शुल्क, प्रकल्प खर्चाचे ४.५ % निश्चित करण्यात आलेले आहे.

याबाबतचे सविस्तर सामंजस्य करार (MoU) नस्तीच्या उजव्या बाजूस संलग्न केलेले आहे. सदर सामजस्य करार (MoU) प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.